N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नाशिक ग्रामीण **P.S.(ठाणे):** इगतपूरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0087 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/05/2025 18:34

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिनांक पासून):** 03/01/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 03/01/2025
   **Time From (वेळेपासून):** 15:19 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 17:53 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 13/05/2025 **Time (वेळ):** 17:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 016

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/05/2025 18:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** इगतपुरी तहसिल कार्यालयातील,पुरवठा विभाग,इगतपुरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रामभाऊ शंकर सारुक्ते

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1965

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | भरवीर खुर्द पो धामणगाव,इगतपुरी,घोटी,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | भरवीर खुर्द पो धामणगाव,इगतपुरी,घोटी,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9689459657

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | ललीत सुभाष पाटील | | | 1. फ्लट नं2,श्रीतीसमळा आक्चर अपार्टमेंट,,पहिला माळा, सदाशिव नगर ,नाशिक,इगतपूरी, नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सोमनाथ रामकिसन टोचे | | | 1. भरवीर खुर्द पोस्ट धामनगाव, इगतपुरी,घोटी,नाशिक ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दि. 13/05/2025

मी रामभाऊ शंकर सारुक्ते, वय 60 वर्षे, मु.भरवीर खु.पो.धामणगाव, ता.इगतपुरी जि.नाशिक मोबाईल क्र. 9689459657
समक्ष हजर राहुन तक्रार देतो की, मी वरीलप्रमाणे नमुद पत्त्यावर राहत असुन माझी पत्नी, मुलगा व सुन यांचेसोबत राहण्यास असुन शेती व्यवसाय करुन तसेच मुलाने चालविण्यास घेतलेले रेशन दुकानातील उत्पनांतुन आम्ही आमचा उदरनिर्वाह करतो.
आमचे गावाची ग्रुप ग्रामपंचायत असुन सदर ग्रामपंचायतीत दिनांक 23/9/2024 रोजी ठराव करुन गावातील 82 कुटुंबाचे विभक्त रेशन कार्ड बनविण्याची चर्चा होवुन नवीन विभक्त रेशन कार्ड बनविण्याबाबत सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात आला त्यात माझा मुलगा नामे महेंद्र रामभाऊ सारुक्ते यांचेदेखील नाव असुन सदर 82 कुटुंबाचे विभक्त शिधापत्रक बनविण्याबाबतच्या ठरावाची प्रत इगतपुरी तहसिल कार्यालय येथील पुरवठा विभागास दिली होती.
मी गावातील माजी सरपंच असल्याने तसेच माझ्या मुलाने गावातील सोसायटीचे रेशन दुकान चालविण्यास घेतले असल्याने गावातील लोकांनी सदर नविन विभक्त रेशन कार्ड तसेच दुय्यम रेशन कार्ड काढुन आणुन देण्याकरिता त्यांचे कागदपत्र माझेकडे जमा केले होते. त्यावेळी सदर लोकांचे विभक्त रेशन कार्ड तसेच माझे मुलाचे रेशन कार्ड काढुन देण्याकरिता चौकशीकामी इगतपुरी तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागातील श्री.पाटील व श्री.गोसावी यांचेकडे गेलो त्यावेळी त्यांनी मला सदर रेशन कार्ड बनवुन देण्याकरिता आमचे काहीतरी करावे लागेल असे सांगितले. त्यावेळी मी श्री.पाटील व श्री.गोसावी यांना विचारले काहीतरी म्हणजे काय, त्यावेळी तेथे आमचे गावातील सोमनाथ हा उभा असल्याने त्यांनी सोमनाथ तुम्हाला सांगेल असे सांगितले. तेव्हा मी सोमनाथ ला विचारले, तर त्याने प्रत्येक रेशन कार्ड मागे 500/-रुपये आणुन देणेबाबत सांगितले. तेव्हा मी माझेजवळ असलेले 4,000/-रुपये देवुन त्याला सांगितले की, यातील बरेचसे कुटुंब पैसे देणार नाहीत तेव्हा सोमनाथने सांगितले की, 30,000/-रुपये तरी लागतील. त्यावेळी मी श्री.पाटील व श्री.गोसावी यांना सांगितले की सोमनाथकडे आता 4,000/-रुपये दिले असुन माझेकडे आता रक्कम नाही नंतर देतो असे सांगितले त्यावेळी श्री.पाटील यांनी सोमनाथकडे आमचे गावातील 22 कुटुंबाचे रेशन कार्ड दिले. त्यानंतर मी तेथुन निघुन आलो. तसेच ते पैशाला फॉर्म पण म्हणतात.
तरी इगतपुरी तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागातील श्री.पाटील व श्री.गोसावी हे आमचे गावातील सोमनाथ यांचेमार्फत माझे मुलाचे व गावातील उर्वरीत 60 कुटुंबाचे विभक्त रेशन कार्ड देण्याकरिता माझेकडे लाचेची मागणी करीत असल्याची माझी खात्री झाल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक येथे दि.3/1/2025 रोजी फोनव्दारे कळविले. त्यानंतर मला श्री.राजेंद्र सानप साहेब, नाशिक यांचा फोन आला असता मी त्यांना घोटी येथे भेटण्यास बोलविले त्याप्रमाणे सानप साहेब हे पथकाबरोबर घोटी गावात जाणाऱ्या रस्त्याच्या बाजुला शासकीय वाहनामध्ये मोकळया जागी आले. तेव्हा मी दि. 03/01/2025 रोजीची तक्रार दिली.
त्यानंतर तक्रारीनुसार मी पथकासह सानप साहेब यांचेकडील सरकारी वाहनाने मुंबई-इगतपुरी हायवे समोरील बोरटेंभे गावात जाणाऱ्या रस्त्याचे बाजुला असलेल्या मोकळया जागी गेलो. तेव्हा सानप साहेबांनी मी दिलेल्या तक्रारीप्रमाणे इगतपुरी तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागातील श्री.पाटील, श्री. गोसावी, व सोमनाथ हे माझेकडे



Scanned with OKEN Scanner

लाच मागतात का याची खात्री करणेसाठी मला रेकॉर्डर लावुन पंच श्री.जाधव सोबत सुचना देवुन मुंबई-इगतपुरी हायवे समोरील बोरटेंभे गावात जाणाऱ्या मोकळ्या जागेतुन इगतपुरी पुरवठा विभागातील श्री.पाटील, श्री. गोसावी, व सोमनाथ यांचे भेटीकरिता दुपारी साधारण 03:30 वाजता निघालो. त्याप्रमाणे मी व पंच श्री.जाधव असे इगतपुरी पुरवठा विभाग येथे गेलो त्यावेळी आमचे गावातील सोमनाथ यांची व माझी इगतपुरी पुरवठा विभागातील श्री.पाटील यांचेबरोबर कामासंबंधी बोलणे झाले. तेव्हा श्री.पाटील यांचे समोर आमचे गावातील सोमनाथ याने माझेकडे गावातील लोकांचे व माझे मुलाचे विभक्त रेशन कार्ड देण्याकरिता 26,000/-रुपये लाच मागितली. तसेच तेव्हा ऑफीसमध्ये श्री.गोसावी हे आलेले नव्हते.

त्यानंतर आमचे गावातील सोमनाथ याने मला फोन करुन पैसे घेवुन लगेच बोलविले असल्याने सानप साहेब यांनी 10,000/-रुपये त्यात 500 रुपये दराच्या 20 नोटांना अन्थ्रासिन पावडर लावुन माझेकडे दिले व लाचेची रक्कम सोमनाथ याने स्विकारल्यानंतर उर्वरीत रक्कम नंतर आणुन देतो असे सांगण्यास सांगितले.
त्यानंतर दिनंक 3/1/2025 रोजी 10,000/-रुपये व रेकॉर्डरसह मला व पंच श्री.जाधव यांना इगतपुरी पुरवठा विभागातील श्री. पाटील व गावातील सोमनाथ यांचे भेटीकरिता आवश्यक त्या सुचना देवुन सायंकाळी 05:30 वाजेचे सुमारास मुंबई-इगतपुरी हायवे समोरील बोरटेंभे गावात जाणाऱ्या मोकळ्या जागेतुन पाठवले.तेव्हा मी व पंच श्री. जाधव असे पुरवठा विभाग येथे गेलो व तेव्हा माझेकडुन आमचे गावातील सोमनाथ याने माझ्याकडुन पुरवठा विभागातील श्री.पाटील यांचेसमोर लाचेची रक्कम रु.10,000/-स्विकारली. त्यावेळी मी घाबरुन गेल्याने मला लाच घेतल्याबाबतचा इशारा करण्याचे सुचले नाही. त्यानंतर तेथुन सोमनाथ व श्री.पाटील हे निघुन गेले व नंतर मी सानप साहेब यांचेजवळ येवुन,''सोमनाथने पैसे घेतले असे सांगितले, पण तो पर्यत आमचे गावातील सोमनाथ व कार्यालयातील श्री.पाटील हे तिथुन निघुन गेले होते. त्यानंतर मी सोमनाथ याला फोन केला तेव्हा त्याने मला वाकी बंगला, उभाड फाटयावर येण्यास सांगितले तेव्हा मी व पथक त्याठिकाणी गेलो तेव्हा सोमनाथ तिथे नव्हता तो मला चुकीची माहिती देत असल्याचे लक्षात आले. तसेच त्याने उर्वरीत 16,000/-रुपये सोमवारी घेवुन या असे फोनवर सांगितले.

त्यानंतर दि.6/1/2025 रोजी श्री.सानप साहेब हे पथकासह पुढील कार्यवाही करणेकरिता घोटी येथे आले तेव्हा मी त्यांना सांगितले की, दि.5/1/2025 रोजी गावातील सोमनाथ हा माझे घरी आला व त्याने मला माझेकडुन घेतलेले 10,000/-रुपये परत दिले व सदरचे पैसे हे पाटील यांना दिले नसुन सर्व पैसे एकत्र तुम्हीच पाटील यांना द्या असे सांगुन सोमनाथ याने आईचे ऑपरेशन असल्याचे सांगुन त्याने येण्यास जमणार नसल्याचे सांगितले.
त्यानंतर मी दि.6/1/2025 रोजी श्री.सानप साहेब यायच्या पहिले श्री.पाटील हे ऑफीसला आहेत का? याची खात्री करणेकरिता त्यांना फोन केला तेव्हा त्यांनी ते कार्यालयात नसल्याचे सांगितले. व त्यानंतर माझेकडील 10,000/-रुपये सानप साहेब यांनी ताब्यात घेवुन त्या तपासल्या असता त्या नोटा या दि.03/01/2025 रोजी माझेकडे लाच म्हणुन सोमनाथ यांना देण्याकरिता असलेल्याच असल्याची सर्वाची खात्री झाली.

त्यानंतर राहिलेले 16,000/-रुपये लाचेची रक्कम देणे बाकी असल्याने मला दिनांक 8/1/2025 रोजी श्री. सानप साहेब व पथक हे घोटी येथे आले असता त्यांनी 16,000/-रुपये नोटांना अन्थ्रासिन पावडर लावुन माझेकडे देवुन मला व पंच श्री.जाधव यांना सुचना दिल्या. त्यानंतर मला सोमनाथ हा पुरवठा विभाग येथे येणार आहे किंवा नाही ? याची खात्री करायला त्याला फोन लावायला सांगितला तेव्हा मी फोन लावला असता तो आईचे ऑपरेशन करिता हॉस्पीटल मध्ये असल्याने तो येणार नसल्याचे सांगितले. त्यानंतर लाचेची रक्कम घेवुन मला व पंच श्री. जाधव यांना इगतपुरी पुरवठा विभागातील श्री. पाटील यांना भेटायला पाठविले त्यावेळी त्यांचेत व माझेत झालेल्या बोलणीदरम्यान त्यांनी माझेकडुन पैसे घेण्यास नकार दिला आहे.

तरी आमचे गावातील सोमनाथ व पुरवठा विभागातील श्री पाटील यांना संशय आल्याने सोमनाथने माझेकडुन लाचेची स्विकारलेली रक्कम मला दि. 5/1/2025 रोजी माझे घरी परत केली असुन उरलेली रक्कम पण ते घेत नसल्याने ते यापुढे माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत याबाबत माझी खात्री झाली आहे.

तसेच मी दि.3/01/2025 रोजी दिलेल्या तक्रारीनुसार करण्यात आलेल्या कारवाई दरम्यान माझे गावातील 60 कुटुंबाचे तसेच माझे मुलाचे विभक्त रेशन कार्ड देण्याचे मोबदल्यात आमचे गावातील सोमनाथ टोचे यांनी इगतपुरी पुरवठा विभागातील श्री.ललीत पाटील यांचेसमक्ष माझेकडे 30,000/-रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी 4,000 /-रुपये यापुर्वी श्री.ललीत पाटील यांना पोहच झाल्याचे सांगुन राहिलेले 26,000/-रुपये लाचेची मागणी करुन सदर रक्कमेपैकी 10,000/-रुपये दिनांक 03/01/2025 रोजी सोमनाथ टोचे याने स्विकारले आहेत. व उर्वरीत 16,000/-रुपये सोमवारी दिनांक 6/1/2025 रोजी आणुन देणेबाबत सांगितले. त्यानंतर त्यांना संशय आल्याने सोमनाथ टोचे याने घेतलेली लाचेची रक्कम रु.10,000/-मला माझे घरी दि.5/1/2025 रोजी परत आणुन दिली असल्याने माझी आमचे गावातील सोमनाथ टोचे व इगतपुरी पुरवठा विभागातील श्री.ललीत पाटील यांचेविरुध्द



Scanned with OKEN Scanner

लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे माझी कायदेशीर फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद मी वाचुन पाहिली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे.

समक्ष हि फिर्याद दिली

दि. 13/05/2025

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
rahul vasantrao tasare(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

(signature)

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

(signature)

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिकारी की स्वाक्षरी)

पोलीस ठाणे अंमलदार
ग्रामीण पोलीस स्टेशन
नाशिक ग्रामीण

**Name** (नाव): rahul vasantrao tasa

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):



Scanned with OKEN Scanner